पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ७२

<u>सभावृत्तांत</u>

दिनांक - ०६/०८/२०१३ वेळ - सकाळी ११.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ०६/०८/२०१३ रोजी सकाळी ११.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.भालेकर अरुणा दिलीप
८) मा.वाघेरे सुनिता राजेश
९) मा.महेशदादा किसन लांडगे
१०) मा.बारणे माया संतोष
११) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१२) मा.कदम सदगुरु महादेव
१३) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१४) मा.शेंडगे आशा सुखदेव

या शिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी - आयुक्त, मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे – सह आयुक्त, मा.गायकवाड, मा.कारचे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.दुरगुडे, मा.माछरे, मा.फुंदे - सहा. आयुक्त, मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक, मा.गावडे - नगरसचिव, मा.कांबळे – प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.डॉ.मनोज देशमुख – प्रभारी वैद्यकीय अधिक्षक, मा.डॉ.रॉय – प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक नगररचना, मा.दुधेकर, मा.निकम, मा.रामदास जाधव, मा.चिंचवडे, मा.कपिले, मा.थोरात, मा.साळवी, मा.लडकत, मा.खाबडे, मा.दांगट, मा.सय्यद, मा.बरशेट्टी, - कार्यकारी अभियंता, मा.कांबळे – प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ, मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधीक्षक, मा.डॉ.गोरे - पशुवैदयकीय अधिकारी, मा.चव्हाण - आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.पोमण - संगणक अधिकारी, मा.शिंपी – नगररचनाकार, मा. जरांडे - सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.३५ : मनपा अधिकारी/कर्मचा-यांना प्रोत्साहनपर एक अगाऊ वेतनवाढ देणेबाबत - मा.सुषमा तनपुरे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३६ : भोसरी प्रभाग क्र.३५ अ चे पोटनिवडणूकीचे व्हिडिओ चित्रीकरणाचे खर्चास मान्यता देणेबाबत -

विषय क्र.३७ : तरतूदी मध्ये फेरबदल करणेबाबत - मा.अरुणा भालेकर, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३८ : तरतूदी मध्ये फेरबदल करणेबाबत - मा.अरुणा भालेकर, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३९ : तरतूदी मध्ये फेरबदल करणेबाबत - मा.अरुणा भालेकर, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४० : तरतूदी मध्ये फेरबदल करणेबाबत - मा.सुषमा तनपुरे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४१ : मनपातर्फे विविध ठिकाणी नागपंचमी साजरी करणेबाबत - मा.सुषमा तनपुरे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४२ : तरतूदीमध्ये वाढ/घट करणेबाबत - मा.अरुणा भालेकर, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४३ : तरतूदीमध्ये वाढ/घट करणेबाबत -मा.अविनाश टेकावडे, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४४ : स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग या विषयामध्ये पदव्युत्तर शिक्षणासाठी दोन वर्षाची अध्ययन रजा मंजूर करणेबाबत व फी अदा करणेबाबत -

विषय क्र.४५ : माहिती तंत्रज्ञान दिनानिमित्त अर्बन ई-गव्हर्नन्स कार्यशाळा व प्रदर्शन याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत -

विषय क्र.४६ : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कॉलसेंटर सुरु करणेकामी आवश्यक संगणक प्रणाली विकसित करणे व यंत्रणा उपलब्ध करणे.

विषय क्र.४७ : सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांचेसाठी झालेल्या विमान प्रवास खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत -

विषय क्र.४८ : बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालयाकरीता क्युरेटरची नियुक्ती करणेबाबत -

विषय क्र.४९ : निविदा नोटीस क्र.८/२-१९९९-२००० च्या मा.लवादाने दिलेल्या निकालानुसार अवॉर्ड र.रु.७९,८७,७१०/- मे.कोर्टात अदा करणेबाबत -

विषय क्र.५० : शहरातील भटकी / मोकाट कुत्री (नर/मादी) पकडणे, शस्त्रक्रिया करणेबाबत -

----------

अ) दिनांक २३/७/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक - ७०) सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक ३०/७/२०१३ व ३१/७/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक - ७१) सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

--------

ठराव क्रमांक – ३८२३ विषय क्रमांक – १
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – स्थापत्य मुख्य कार्यालय
सुचक –मा.अविनाश टेकावडे अनुमोदक –मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्थ/४ड/कावि/२२६/१३ दि.२३/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुंबई-पुणे रस्ता पिंपरी चौक ते निगडी कर्बस्टोन फुटपाथचा रस्ता दुभाजक इ. देखभाल व दुरुस्ती करणे या कामासाठी सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकात र.रु. ५० लाख तरतुद करणेत आली असुन, सदर कामाचा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यामुळे सदर कामावर तरतुद केलेली संपुर्ण रक्कमेची गरज सध्या भासणार नाही. त्यामुळे सदर कामावरील र.रु. ५० लाख मधुन र.रु २० लाख वर्ग करता येणे शक्य असल्याने विशेष योजना पा.क्र. ४६ अ.क्र. १२२ वरील कामातुन र.रु २० लाख फक्त विशेष योजना पा. क्र. ४६ अ.क्र.११५ चे कामासाठी वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८२४ विषय क्रमांक – २
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – ड प्रभाग
सुचक –मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.डप्र/१७/कावि/२४०/१३ दि.२५/०७/२०१३

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१३-१४ अन्वये, प्रभाग क्र.४४ ते ५१ व ५३ ते ६० मधील स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स साफ करून गाळाची वाहतुक करणेकामी मे.सिध्दीविनायक ट्रान्सपोर्ट (नि.र.रू. ५,९३,७०९/- (र.रू.पाच लाख त्र्यान्नव हजार सातशे नऊ) पेक्षा १९.००% कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८२५ विषय क्रमांक – ३
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – वाहन दुरुस्ती कार्यशाळा
सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.सह.शहर अभियंता (वि.यां) यांचे जा.क्र.काशा/०३/कावि/३४४/१३ दि.२३/०७/२०१३
विषय- मनपाकडील जे.सी.बी.यंत्रणा दुरुस्ती करणेकामी एजन्सी निश्चित करणेबाबत.

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८२६ विषय क्रमांक – ४
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – विदयुत-EWS
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/WTP-EWS/१०/१३ दि.१५/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे JNNURM-EWS प्रकल्पास विजपुरवठा करणेसाठी भोसरी येथील 220/22 KV क्षमतेच्या विजग्रहण केंद्रामध्ये बे-ब्रेकर उभारणीच्या कामाचे शुल्क र.रू. ४५,४१,०००/- म.रा.वि.कंपनीस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८२७ विषय क्रमांक – ५
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – विदयुत
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.विसुका/४/कावि/४२२/१३ दि.२५/०७/२०१३
विषय- अशुध्द जलउपसा केंद्र रावेत येथील पंपगृहातील टप्पा-३ व ४ अंतर्गत पंपींग मशिनरीची वार्षीक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणेबाबत.

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८२८ विषय क्रमांक – ६
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – विदयुत
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.विसुका/४/कावि/४२१/१३ दि.२५/०७/२०१३
विषय- अशुध्द जलउपसा केंद्र रावेत येथील पंपगृहातील टप्पा-१ ते ४ अंतर्गत उच्चदाब मोटर्सची दुरुस्ती /रिवायडींग वार्षीक पध्दतीने करणे व अनुषंगीक कामे करणेबाबत.

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८२९ विषय क्रमांक – ७
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – पाणी पुरवठा
सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./जशुके/पापु/१७२/१३ दि.२६/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील अनधिकृत नळजोड नियमित करणेकामी दिनांक ३० ऑक्टोबर २०१३ पर्यंत नळजोड नियमित करुन घेण्यासाठी अर्ज न केलेल्या अनधिकृत नळजोडधारकांवर नळजोड तोडण्याची तसेच असे निवासी नळजोड नियमित करण्यासाठी तक्त्यातील फक्त दंडाच्या रकमेत दुपटीने (उदा. १५ मिमी साठी र.रु.१५००|- ऐवजी र.रु.३०००|- ) वाढ करणे, व वाणिज्य नळजोड नियमित करण्यासाठी तक्त्यातील दंडासह पाणीपट्टीच्या रकमेत १० टक्के वाढ ( उदा. १५ मिमी साठी र.रु.१८०००|- ऐवजी र.रु.१९८००|- ) करण्यात यावी. तसेच दिनांक ३० एप्रिल २०१३ नंतर अनधिकृत

नळजोड नियमित करण्यासाठी प्रस्तावात नमुद तक्त्यातील रकमेच्या दुप्पट रक्कम ग्राहकाने यापूर्वी अदा केलेली असल्यास सदरची जादाची रक्कम अशा ग्राहकाच्या पुढील पाणी बिलात समायोजित करण्यात यावी. अशा ग्राहकांकडे पूर्वीचा पाणी मीटर असू शकतो, तो मीटर सुस्थितीत नसल्यास नवीन मीटर बसविणे तसेच मीटर नसल्यास स्वखर्चाने मीटर बसविणे आवश्यक आहे. मीटर बसविल्यानंतरच अशा ग्राहकांची नोंद मीटर क्रमांकासह संगणक प्रणालीत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८३० विषय क्रमांक – ८

दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – नागरवस्ती विकास योजना

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/०१/कावि/६५६/१३ दि.२३/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची मागणी असली तरी -

मनपाचे नागरवस्ती विभागाकडील विविध योजनांच्या डाटा एंन्ट्री संगणकावर करून घेणेकामी मे.शुभम उद्योग यांना ५ डेटा एंन्ट्री कॉम्प्युटर ऑपरेटर २ महिन्याकरिता र.रू.७,६६३.१८ (र.रू.सात हजार सहाशे त्रेसष्ट पैसे अठरा) या दराने व थेट पध्दतीने पुरविणेकामी व त्यापोटी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत यावी अशी मा.आयुक्त यांची मागणी असली तरी ५ डाटाएंन्ट्री कॉम्प्युटर ऑपरेटर २ महिन्या ऐवजी नागरवस्ती विभागाला आवश्यक असेल तितके दिवस घेणेची व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८३१ विषय क्रमांक – ९

दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – ड प्रभाग

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.डप्र/१७/कावि/२४१/१३ दि.२५/०७/२०१३

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.२/२०१३-१४ अन्वये, ड प्रभाग कार्यक्षेत्रातील नाले साफ करून गाळाची वाहतुक करणेकामी मे.सिध्दीविनायक ट्रान्सपोर्ट (नि.र.रू.९,९०,७७०/- (र.रू.नऊ लाख नव्वद हजार सातशे सत्तर) पेक्षा सु.दर १०.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८३२ विषय क्रमांक – १०

दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/जी/कावि/१६१अ/१३ दि.२९/०७/२०१३

विषय- प्राधिकरण से.क्र.२६ मधील तळयाशेजारील वीर सावरकर उद्यानातील उर्वरित कामे करणे.

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८३३ विषय क्रमांक – ११
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/जी/कावि/१६१/१३ दि.२९/०७/२०१३
विषय- ड प्रभागातील उद्यानांचे स्थापत्य व उद्यान विषयक नुतनीकरणाची कामे करणेबाबत.

विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८३४ विषय क्रमांक – १२
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/२३९/१३ दि.३०/०७/२०१३
विषय- वॉर्ड क्र.८१ मधील उर्वरित रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत.

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८३५ विषय क्रमांक – १३
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/२३८/१३ दि.३०/०७/२०१३
विषय- वॉर्ड क्र.९० येथे रस्त्यावरील खड्डे क्रॉसकट हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरणाने दुरुस्ती करणेबाबत.

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८३६ विषय क्रमांक – १४
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/२३७/१३ दि.३०/०७/२०१३
विषय- स.न. १० सांगवी येथील संत गोराकुंभार उद्यानाचे नुतनीकरण करणेबाबत.

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८३७ विषय क्रमांक – १५
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/२३६/१३ दि.३०/०७/२०१३

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधिल अ.क्र.२२ अन्वये, काळेवाडी वॉर्ड क्र.७९ विष्णूराज कार्यालय परिसरात हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रु.२३,२०,२२३/- (अक्षरी र.रु.तेविस लाख वीस हजार दोनशे तेवीस) पेक्षा १७.६० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.२०,०७,४५७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८३८ विषय क्रमांक – १६

दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भः- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/२३५/१३ दि.३०/०७/२०१३

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधिल अ.क्र.४३ अन्वये, काळेवाडी वॉर्ड क्र.८० राजवाडेनगर परिसरात हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रु.२३,२०,२२३/- (अक्षरी र.रु.तेविस लाख वीस हजार दोनशे तेवीस) पेक्षा १७.६० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.२०,०७,४५७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८३९ विषय क्रमांक – १७

दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – अतिक्रमण

सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अति/३/कावि/१२४/१३ दि.३०/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम निर्मुलनासाठी नेमण्यात आलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे माहे सन १९९९ ते मे २००९ या कालावधीची पोलीस संरक्षण खर्चा पोटी देयकाची थकीत वेतनाची रक्कम रू.१,८२,९४१६१/- (अक्षरी एक कोटी ब्याआंशी लाख चौ-यान्नव हजार एकशे एकसष्ठ रुपये फक्त)अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८४० विषय क्रमांक – १८
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – वाहतूक कक्ष
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/वाक/कावि/१२२/१३ दि.१०/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.शहर सुधारणा समिती सभा दि. १७/०७/२०१३ ठराव क्र.२१ नुसार, पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील काही प्रमुख रस्त्यांवर फ्लायओव्हरखाली व वाहनतळांच्या जागांवर दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता पे & पार्क योजना राबविणे आवश्यक आहे. याकरीता पिं.चिं.मनपा हद्दीतील भोसरी फ्लायओव्हर,निगडी फ्लायओव्हर,चाफेकर चौक फ्लायओव्हर, क्रोमा शोरुम शेजारील जागा या ठिकाणी पे & पार्क योजना राबविणेचे नियोजन आहे. याकामी पुणे मनपा कडील पे & पार्क च्या दरांचा अभ्यास केला असुन त्यांचेकडील दर पिं.चिं.मनपा क्षेत्रातही लागु केल्यास सुसूत्रता राहील असे वाटते. त्यानुसार पे & पार्क चे शुल्क (Telescoping Parking Charges) पुढीलप्रमाणे सुचविणेत येत आहे.

१) रस्त्यावरील वाहनतळ
अ) दुचाकी वाहनांकरिता -
पहिल्या एक तासापर्यंत – र.रु.३/-
१ तासापुढील कालावधीसाठी – र.रु.४/- प्रति/तास
ब) चारचाकी वाहनांकरीता -
प्रत्येक तासाकरिता – र.रु. १०/-

२) मनपामार्फत तसेच विकास आराखडयातील तरतुदीनुसार विकसित केलेले वाहनतळ /फ्लायओव्हर खालील वाहनतळ
अ) दुचाकी वाहनांकरिता –
पहिल्या एक तासापर्यंत – र.रु.२/-
१ तासापुढील कालावधीसाठी र.रु.३/-प्रति/तास
फक्त रात्री ९ ते सकाळी ८ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु. १५०/-
ब) चारचाकी वाहनांकरिता -
प्रत्येक तासाकरिता – र.रु.१०/-
फक्त रात्री ९ ते सकाळी ८ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु. ४५०/-

विद्यार्थ्यांसाठी मनपामार्फत देण्यात येत असलेल्या अन्य सवलतीचे धोरणांनुसार विद्यार्थ्यांना पार्किंग सवलत देऊन त्यांना त्यांचे शाळेचे /कॉलेजचे ओळखपत्र व वाहन परवाना सादर केल्यास त्यांना दरमहा र.रु. १००/- याप्रमाणे पार्किंग शुल्क आकारावे. तसेच सदर पे & पार्क योजनेअंतर्गत दूचाकी व चारचाकी वाहनांकरिता ३ वर्ष कालावधीसाठी ठेका देणेसंदर्भातील अटी व शर्ती प्रस्तावा सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे आहेत.सदरचे पे & पार्क योजनेच्या प्रस्तावित दरास मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८४१ विषय क्रमांक – १९
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – क्रीडा
सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/७/कावि/५५८/१३ दि.०९/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा. क्रिडा समितीची सभा दि.१७/०७/२०१३ रोजी ठराव क्र.१२ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, पुणे जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने व नवप्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर,चिंचवड, पुणे ३३ यांचे सहकार्याने दिनांक २९ ते ३१ जुलै २०१३ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळात महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा आयोजित करणेस व त्या कामी येणा-या र.रु.२,००,०००/- च्या खर्चास मान्यता घेणे व कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन प्राप्त झालेल्या मंजूर दरानुसार ट्रॉफिज स्मृतिचिन्हे,चहा व अल्पोपहार व्यवस्था, पी.व्ही.सी फ्लेक्स बॅनर्स तयार करुन घेणेस व भांडार विभागाकडील निविदा मंजूर दरानुसार निमंत्रणपत्रिका, सर्टिफिकेट्स खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८४२ विषय क्रमांक – २०
दिनांक – ०६/८/२०१३
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भः- मा.मंदाकिनी ठाकरे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव -

मा. क्रिडा समितीची सभा दि.१७/०७/२०१३ रोजी ठराव क्र.१४ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक ६/७/२०१३ रोजी सकाळी १०.०० ते ३.०० या वेळात आचार्य अत्रे रंगमंदीर, पिंपरी १८ येथे शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१३-१४ अनुषंगाने नियोजन सभा आयोजित केलेली होती. सदर सभेस चहा व अल्पोपहाराची व्यवस्था करणे आवश्यक होते. सदर सभा अनुषंगाने सभेस चहा व अल्पोपहाराची व्यवस्था करणेकामी क्रीडा विभागाकडील कोटेशन नोटीस क्रमांक क्रीडा/३/कावि/२६३/२०१३ दिनांक ८/७/२०१३ अन्वये इच्छुक पुरवठाधारकांकडुन सामोसा व चहा चे दर मागविणेकामी कोटेशन नोटीस महापालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द केलेली होती. त्यानुसार एकुण ०३ पुरवठाधारकांनी सदर चहा व अल्पोपहाराची दरपत्रके सादर केलेली आहेत. त्यामध्ये मे न्यु वैशाली स्वीट्स संत तुकाराम नगर पिंपरी पुणे यांनी अल्पोपहाराची व्यवस्था करणेकामी सर्वात लघुत्तम दरपत्रक सादर केल्याने त्यांना सामोसा ६०० नग व ३०० कप पुरवठा करणेकामी कामाचे आदेश दिले होते. मे.न्यु वैशाली स्वीट्स,पिंपरी यांनी शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१३ – १४ अनुषंगाने आयोजित केलेल्या सभेस उपस्थित राहिलेल्या मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक यांचेकरीता सामोसा ६०० नग व ३०० कप चहा पुरविलेबाबत त्याकामी आलेल्या र.रु.७,६८०/- चे खर्चास मान्यता व सदरचे बील मे.न्यू वैशाली स्वीट्स,पिंपरी यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८४३ विषय क्रमांक – २१

दिनांक – ०६/८/२०१३

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.मंदाकिनी ठाकरे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव -

मा. क्रिडा समितीची सभा दि.१७/०७/२०१३ रोजी ठराव क्र.१६ नुसार, पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर येथे २९ ऑगस्ट २०१३ क्रीडा दिना निमीत्त जलतरण स्पर्धा आयोजित करणेस व स्पर्धा अनुषंगाने सहभागी खेळाडुंना प्रमाणपत्रे व विजयी खेळाडुंना पुष्पगुच्छ व ट्रॉफिज खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु. २०,०००/- (अक्षरी र.रु.वीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८४४ विषय क्रमांक – २२

दिनांक – ०६/८/२०१३

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक –मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.भारती फरांदे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

मा. क्रिडा समितीची सभा दि.१७/०७/२०१३ रोजी ठराव क्र.२१ नुसार, पिंपरी चिंचवड मनपाच्या ३ व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविणेस दिलेल्या असुन त्या कायम बंद असतात, तसेच त्या ठिकाणी अस्वच्छता नेहमी असते. त्यामुळे नागरीकांची गैरसोय होत असल्याने सदर व्यायामशाळा मनपाच्या ताब्यात घेऊन मनपा मार्फत चालविणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावात नमुद प्रमाणे सेवाशुल्क तत्वावर चालविणेस दिलेल्या ३ व्यायामशाळेची मुदत संपुष्टात आल्याने त्यांचा ताबा मनपाकडे घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८४५ विषय क्रमांक – २३

दिनांक – ०६/८/२०१३

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे

संदर्भ:- मा.भारती फरांदे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

मा. क्रिडा समितीची सभा दि.१७/०७/२०१३ रोजी ठराव क्र.२३ नुसार, पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने प्रभाग क्र.५५ पिंपळे सौदागर येथील क्रीडांगणावर महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१३ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.३५ लाख ( अक्षरी र.रु. पस्तीस लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८४६ विषय क्रमांक – २४

दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – वायसीएमएच विद्युत

सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/वायसीएमएच/मुपुर/१/०१/१३ दि.२९/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण रुग्णालयातील ३०० KVA क्षमतेच्या दोन्ही जनरेटरचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचे उत्पादित कंपनीची अधिकृत सेवा देणारी एजन्सी मे. ट्रायडेंट सर्विसेस प्रा. लि., पुणे यांचे कडून दि. १/०८/२०१३ ते दि. ३१/०७/२०१४ या कालावधीकरीता करारनामा न करता करवून घेणेस व त्याकामी AMC चार्जेस सर्व करांसह र.रु.७४,७७६/- (र.रू.चौ-याहत्तर हजार सातशे शहात्तर) इतकी रक्कम आगाऊ अदा करणेस व प्रत्यक्ष देखभाल दुरुस्तीकरीता लागणा-या सुट्या साहित्यापोटी येणारा खर्च त्या त्या वेळी वेगळा अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८४७ विषय क्रमांक – २५

दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/८/कावि/३४२/१३ दि.३०/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ शेड्युल चॅप्टर ५(२) नुसार निविदा न मागविता करारनामा न करता तातडीची बाब म्हणुन मनपास आवश्यक वेगवेगळ्या प्रकारच्या बॅट-या मे.एक्साईड इंडस्ट्रीज लि. पुणे या उत्पादीत कंपनीकडुन उपलब्ध तरतुद र.रु.१५,००,०००/- मध्ये आवश्यकतेनुसार टप्याटप्याने थेट खरेदी करणेसच व येणा-या खर्चास एकुण रु.रु १२,७०,५९३/-चे खर्चास मान्यता घेणेकामी व सदरची रक्कम मे.एक्साईड इंडस्ट्रीज लि.पुणे यांना टप्याटप्यामध्ये आगाऊ स्वरुपात अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८४८ विषय क्रमांक – २६

दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – उद्यान

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/१३/कावि/८४/१३ दि.०१/०८/२०१३

विषय- उद्यान विभागातील सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकात झालेल्या खर्चासाठी तरतूद वर्ग करणेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक २६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८४९ विषय क्रमांक – २७
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/५/कावि/४९०/१३ दि.३१/०७/२०१३
विषय- सी.आर.फिल्म खरेदीबाबत.

विषय क्रमांक २७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८५० विषय क्रमांक – २८
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – विद्युत मुख्य
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.सशअ/२६३/१३ दि.०१/०८/२०१३
विषय : तरतूद वर्ग करणेबाबत.

विषय क्रमांक २८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८५१ विषय क्रमांक – २९
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – उद्यान
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/६/कावि/५४९/१३ दि.३१/०७/२०१३
विषय- ड प्रभागातील मनपाचे विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणेबाबत
(निविदा क्र.९/२-२००९-२०१०)

विषय क्रमांक २९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८५२ विषय क्रमांक – ३०
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – उद्यान
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/६/कावि/५४७/१३ दि.३१/०७/२०१३
विषय- ब प्रभागातील मनपाचे विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणेबाबत
(निविदा क्र.९/१-२००९-२०१०)

विषय क्रमांक ३० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८५३ विषय क्रमांक – ३१
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – उद्यान
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/६/कावि/५४६/१३ दि.३१/०७/२०१३
विषय- अ प्रभागातील मनपाचे विविध उद्याने देखभाल व संरक्षण करणेबाबत
(निविदा क्र.१/(१-अ)-२००९-२०१०)

विषय क्रमांक ३१ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८५४ विषय क्रमांक – ३२
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/३३६/१३ दि.०१/०८/२०१३
विषय- चिंचवड येथील आरक्षण क्र.२२२ येथे कंपाऊंड वॉल व उद्यान विकासाची कामे करणेबाबत.

विषय क्रमांक ३२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८५५ विषय क्रमांक – ३३
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.छाया साबळे
संदर्भ:- मा. शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/३३७/१३ दि.०१/०८/२०१३

मा. शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२८/२०१२-१३ मधिल अ.क्र.८ अन्वये, ब प्रभागातील उदयानामध्ये स्वच्छतागृह बांधणेकामी मे.सिध्दी एंटरप्रायजेस (नि.र.रु.८,६८,३४४/- (अक्षरी र.रु.आठ लाख अडुसष्ठ हजार तीनशे चव्वेचाळीस) पेक्षा १६.०० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. ७,६५,८७९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे बाजारभावानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८५६ विषय क्रमांक – ३४
दिनांक – ०६/८/२०१३ विभाग – क्रीडा विभाग
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/अस्था-२/कावि/११४२/१३ दि.०१/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मे.न्यु जॉय स्पोर्टस क्लब, यांनी पुरवठा केलेल्या जीवरक्षकांचे दि. १८/०७/२०१३ रोजी घेतलेल्या चाचणीचा अहवाल मान्यतेसाठी तसेच अपात्र झालेले जीवरक्षकांनी प्रत्यक्षपणे तलावावर कामकाज केलेले

असल्याने त्यांचे बील व पात्र असलेल्या जीवरक्षकांचे बील अदायगीस मान्यता मिळणेकामी तसेच निविदेप्रमाणे पुर्ण १ वर्ष कालावधी करीता १८ जीवरक्षक X ८,०००/- (मान्यदर) = १,४४,०००/- प्रतीमहा प्रमाणे १२ महिने X १,४४,०००/- = १७,२८,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक – ३८५७ विषय क्रमांक – ३५

दिनांक – ०६/०८/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ज्या अधिकारी कर्मचारी यांनी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामधील पी.एम.पी.एल.कडील विविध प्रकारचे पासेसची तपासणी केली व सदर तपासणीमध्ये मनपाचे र.रु.दोन कोटी वाचविले. अशा खालील अधिकारी व कर्मचा-यांचे अभिनंदन करुन त्यांना प्रोत्साहनात्मक एक आगाऊ वेतनवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कर्मचारी/अधिकारी नांव | पदनाम | विभाग |
|---|---|---|---|
| १ | श्री. अविनाश मुरलीधर देव | लेखाधिकारी | लेखा विभाग |
| २ | श्री. संभाजी भगवान ऐवले | सहा.समाजविकास अधि. | नागरवस्ती विभाग |
| ३ | श्री. अशोक बोनगीर | लेखापाल | जनता संपर्क विभाग |
| ४ | श्री. नितीन ठोंबरे | लिपिक | प्रशासन विभाग |
| ५ | श्रीमती. धनश्री घाणेकर | उपलेखापाल | लेखा विभाग |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३८५८ विषय क्रमांक – ३६

दिनांक – ०६/०८/२०१३ विभाग – निवडणूक

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.निवडणूक/०१/कावि/३९६/२०१३, दि.०३/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे प्रभाग क्र.३५अ भोसरी गावठाणसाठी दि.०७/०७/२०१३ पोटनिवडणूक घेण्यात आली व दि.०८/०७/२०१३ रोजी मतमोजणी झाली आहे. आदर्श आचारसंहितेचे पालन होणे तसेच नामनिर्देशन पत्र भरणे ते मतमोजणी होणेचे दिनांकापर्यंत प्रत्येक क्षणाचे व्हिडिओ चित्रीकरण करणे आवश्यक असते. त्याप्रमाणे मनपाचे सार्वत्रिक निवडणूक २०१२ चे वेळेस सदर कामकाजाकरीता लघुत्तम ठेकेदाराचे मे. रोहित एंटरप्राईजेस, पुणे यांचे दर मंजूर करणेत आले होते. त्याच दराने पुन्हा पोटनिवडणूकीचे वेळी ते कामकाजास तयार होते. त्याप्रमाणे त्यांना पोटनिवडणूकीचे व्हिडिओ चित्रीकरणाचे कामकाज देण्यात आले होते. पोटनिवडणूकीच्यावेळी व्हिडिओ चित्रीकरण करणेस मे.रोहित एंटरप्राईजेस यांनी त्यांना

देण्यात आलेल्या कामाचे आदेशाप्रमाणे पोटनिवडणूकीचे चित्रीकरण करुन कॅमेरे व कॅमेरामनसह चे बील र.रु.४१,८५०/- मिळणेकामी विनंती केलेली आहे. सदरचे बील त्यांना देय असल्याने ते अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३८५९ विषय क्रमांक – ३७

दिनांक – ०६/०८/२०१३

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.अरुणा भालेकर, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

सन २०१३-१४ च्या अर्थसकल्पातील “ ड ” प्रभाग व “ ड ” मुख्यालयातील कामांच्या तरतूदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट ३३,७५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३८६० विषय क्रमांक – ३८

दिनांक – ०६/०८/२०१३

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.अरुणा भालेकर, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

सन २०१३-१४ च्या अर्थसकल्पातील “ ड ” प्रभाग व “ ड ” मुख्यालयातील कामांच्या तरतूदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट १७,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३८६१ विषय क्रमांक – ३९

दिनांक – ०६/०८/२०१३

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.अरुणा भालेकर, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

सन २०१३-१४ च्या अर्थसकल्पातील “ ड ” प्रभाग व “ ड ” मुख्यालयातील कामांच्या तरतूदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट २,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३८६२ विषय क्रमांक – ४०

दिनांक – ०६/०८/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे,मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव -

सन २०१३-१४ च्या अर्थसकल्पातील “ अ ” मुख्यालयातील कामांच्या तरतूदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट लाखात ११.५०)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३८६३ विषय क्रमांक – ४१

दिनांक – ०६/०८/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे,मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव -

खाली नमुद केलेल्या ठिकाणी मनपातर्फे नागपंचमी साजरी करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

१) वॉर्ड क्र.५९ मधुबन संत गोरा कुंभार उद्यान, जुनी सांगवी

२) प्र.क्र.२८ मासुळकर कॉलनी

३) से.२५ निगडी प्राधिकरण , विठ्ठल रुख्मीणी उद्यान.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३८६४ विषय क्रमांक – ४२

दिनांक – ०६/०८/२०१३

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.अरुणा भालेकर, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकातील अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील काही कामांना कमी तरतूद असल्यामुळे या कामांची देयके अदा करता येत नाहीत. तरी सन २०१३-१४ च्या मुळ अंदापत्रकातील ३ कमी तरतूद असलेल्या कामांस र.रु.२१,५०,०००/- एवढी रक्कम याच प्रभागातील जास्त तरतूद असलेल्या तसेच नविन कामामध्ये होणा-या बचतीमधून एकूण ३ इतर कामांमधून प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३८६५ विषय क्रमांक – ४३

दिनांक – ०६/०८/२०१३

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव -

अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकातील अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील काही कामांना कमी तरतूद असल्यामुळे या कामांची देयके अदा करता येत नाहीत. तरी सन २०१३-१४ च्या मुळ अंदापत्रकातील ३ कमी तरतूद असलेल्या कामांस र.रु.६०,००,०००/- एवढी रक्कम याच प्रभागातील जास्त तरतूद असलेल्या तसेच नविन कामामध्ये होणा-या बचतीमधून एकूण २ इतर कामांमधून प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३८६६ विषय क्रमांक – ४४
दिनांक – ०६/०८/२०१३ विभाग – प्रशासन
सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.प्रशासन/०४/कावि/७८८/२०१३, दि.३१/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.बरीदे यांची उच्च शिक्षणासाठी एकूण २४ महिने अध्ययन रजा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील प्रकरण ७ नुसार मंजूर करणेस मान्यतेसाठी व त्यांचेकडून महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील विहित नमुन्यात र.रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर बंधपत्र लिहून घेऊन प्रत्यक्ष उच्च शिक्षण कालावधीची अध्ययन रजा मंजूर करणेस मान्यतेसाठी व श्री. बरीदे यांना अध्ययन रजा कालावधीत महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियमातील तरतुदीनुसार वेतन अदा करणेस, तसेच श्री.बरीदे यांनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे यांना अदा केलेली कोर्सची फी प्रतिपुर्ती करुन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ३८६७ विषय क्रमांक – ४५
दिनांक – ०६/०८/२०१३ विभाग – ई-गव्हर्नन्स
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.ई-गव्ह/१०/कावि/२९१/२०१३, दि.०६/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महानगरपालिकेतर्फे माहिती तंत्रज्ञान दिवसानिमित्त अर्बन ई-गव्हर्नन्स कार्यशाळा व प्रदर्शन आयोजित करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मनपाचे बोधचिन्ह व ई-गव्हर्नन्स, पर्यावरण विषयक संदेश असलेले साहित्य येणा-या प्रमुख पाहुण्यांना वाटप करणेकामी कोटेशन न मागविता, करारनामा न करता **M/s. Fine Point, Pimpri, Pune 18** यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेस तसेच प्रत्येकी १०० नग साहित्याचे र.रु.७८,०००/- अधिक विक्रीकर (Sales Tax) र.रु.३,९००/- असे एकूण र.रु.८१,९००/- आगाऊ अदा करणेस व सदरचा खर्च ई-गव्हर्नन्स विभागाचे " ई-गव्हर्नन्स " या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३८६८ विषय क्रमांक – ४६
दिनांक – ०६/०८/२०१३ विभाग – ई-गव्हर्नन्स
सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.ई-गव्ह/५/कावि/३४८/२०१३, दि.०६/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महानगरपालिकेचे कॉलसेंटर सुरु करणे व त्या अनुषंगाने आवश्यक संगणक प्रणाली विकसित करणे, यंत्रणा उपलब्ध करणे व त्याची एक वर्ष कालावधीसाठी देखभाल दुरुस्ती M/s. Tech 9 Services

यांचे मार्फत करणेकामी येणा-या र.रु.१३,९१,४००/- इतक्या खर्चाचे विहित नमुन्यात करारनामा करुन कामकाज करणेस व सदरचा खर्च ई-गव्हर्नन्स विभागाचे " ई-गव्हर्नन्स " या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३८६९ विषय क्रमांक – ४७
दिनांक – ०६/०८/२०१३ विभाग – झो.नि.पु.
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.झोनिपु/१/कावि/९२७/२०१३, दि.३०/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.दिलीप गावडे, सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, झोनिपु-प्रशासन विभाग यांचेसाठी तातडीचे कार्यालयीन कामकाजासाठी दिल्ली व नागपूर या ठिकाणी जाणेसाठी झालेला विमान प्रवास खर्च एकूण र.रु.९६,२२२/- (अक्षरी र.रु.शहाण्णव हजार दोनशे बावीस फक्त) साठी कार्योत्तर मान्यता व यापुढे मा.आयुक्त यांचे मान्यतेने विमान प्रवास करणेस व त्यासाठी येणारा प्रत्यक्ष खर्च अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३८७० विषय क्रमांक – ४८
दिनांक – ०६/०८/२०१३ विभाग – पशुवैद्यकीय
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.पवै/०१/कावि/५७/२०१३, दि.०६/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागांतर्गत निसर्ग कवी बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालयामध्ये केंद्र शासनाच्या सेंट्रल झू अथोरिटी कार्यालयातर्फे दिलेल्या सुचना नुसार तांत्रिक पदे नियुक्त करणे आवश्यक आहे. त्यानुसार क्युरेटर या तांत्रिक पदाकरीता झुऑलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया, निगडी - ४४ या संस्थेतून शास्त्रज्ञ-सि या पदावरुन सेवानिवृत्त झालेले डॉ.आर.एच.कांबळे यांची क्युरेटर या पदावर दरमहा एकत्रित मानधन र.रु.२५,०००/- नेमणुक करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक – ३८७१ विषय क्रमांक – ४९
दिनांक – ०६/०८/२०१३ विभाग – अ प्रभाग विद्युत
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.अप्र/वि/१/कावि/६४५/२०१३, दि.०३/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

निविदा नोटीस क्र.८/२-१९९९-२००० या कामांतर्गत मा.लवादाने अवार्ड जाहिर केले आहे त्यामध्ये मनपा विरुध्द दिलेल्या निकालानुसार अवॉर्ड र.रु.७९,८७,७१०/- मे. कोर्टमध्ये जमा करणे आवश्यक असून सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकामध्ये सदर कामाकरीता तरतूद करणेत आलेली नाही. तथापि सदर रक्कम तपशिलवार वर्गीकरणानंतर अदा करणेचा प्रस्ताव तयार करणेत येत असून मे.कोर्टामध्ये रकमेची अदायगी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८७२ विषय क्रमांक – ५०

दिनांक – ०६/०८/२०१३ विभाग – पशुवैद्यकीय

सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.पशुवै/१/कावि/३४/२०१३, दि.०५/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महापालिका हद्दीमध्ये शहरातील भटकी/मोकाट कुत्री (नर/मादी) पकडणे, शस्त्रक्रिया करणेचे कामकाजाकरीता दोन संस्थांची नेमणूक करणे आवश्यक असल्याने १) मे.पिपल फॉर अनिमल्स, भवानीपेठ, २) मे.सोसायटी फॉर अनिमल प्रोटेक्शन, कोल्हापूर या दोन्ही संस्थेकडून उक्त कामकाज र.रु.६७९/- प्रति प्राणी (कुत्रा/कुत्री) शस्त्रक्रिया नुसार १ वर्ष कालावधीकरीता म.न.पा. समवेत करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८
क्रमांक - नस/४/कावि/७३७/२०१३
दिनांक - ०८/०८/२०१३.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.